साप्ताहिक

"एकच ध्येय... एकच आवाज"

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ४० वा | सोमवार, दि. १९/१०/२०२६ ते दि. २५/१०/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## आरोपी विजय खैरनारच्या शिक्षेची त्वरित अंमलबजावणी करा
## भाजप महिला पदाधिकाऱ्यांकडून यज्ञा दुसाने भावपूर्ण श्रद्धांजली



धुळे – मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील चाडेचारवर्षीय बालिका यज्ञा दुसाने हिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिचा खून करणाऱ्या आरोपी विजय खैरनारला मालेगाव येथील विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. अवघ्या १० महिन्यांत न्यायव्यवस्थेसह शासनाने या प्रकरणी जलदगतीने न्याय मिळवून दिल्याने समाधान व्यक्त करत भारतीय जनता पक्षाच्या येथील महिला पदाधिकाऱ्यांनी पीडिता यज्ञाला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आता आरोपीला झालेल्या फाशीच्या शिक्षेची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणीही त्यांनी केली. डोंगराळे (ता. मालेगाव) येथे गेल्या १६ नोव्हेंबर २०२५ ला दुपारी घराबाहेर खेळत असताना साडेचार वर्षांची यज्ञा दुसाने अचानक गायब झाली होती. या प्रकरणी गावातीलच आरोपी विजय खैरनार (वय २४) याने तिचे अपहरण करत तिच्यावर अमानुष लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केली होती. या घटनेमुळे डोंगराळे गावासह संपूर्ण राज्यात तीव्र संताप व्यक्त होत होता. पोलिसांनी शिताफीने तपास करत त्याच दिवशी आरोपी विजय खैरनारला ताब्यात घेत अटक केली होती. शासनाने जनभावनेचा आदर करत या प्रकरणी विशेष जलदगती न्यायालयाची स्थापना करत पीडिता यज्ञातर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती केली होती. विशेष बाब म्हणजे या संपूर्ण प्रकरणात कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हता किंवा सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नव्हते, तरीही परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे ३० सप्टेंबर २०२६ रोजी न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले होते. यानंतर १६ ऑक्टोबर २०२६ रोजी न्यायालयाने हा खटला 'दुर्मिळातील दुर्मिळ' मानत आरोपी विजय खैरनारला फाशीची शिक्षा सुनावली होती.

फाशीची शिक्षा त्वरित अमलात आणा – आता आरोपीला झालेल्या फाशीच्या शिक्षेची तातडीने अंमलबजावणी करत यज्ञाला खरा न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करत भारतीय जनता पक्षाच्या बेटी बचाव बेटी पढाव अभियानाच्या प्रदेश प्रभारी अल्पा अग्रवाल, भाजपच्या प्रदेश सरचिटणीस जयश्री अहिरराव, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, महिला व बालकल्याण सभापती उज्वला ठाकरे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णा पाटील, नगरसेविका प्रतिभा चौधरी, कल्पना महाले, कल्याणी अंपळकर, मोहिनी धात्रक, संगीता चौधरी, छाया पाटील, सुरेखा ठाकरे, राजश्री निकम, सुवर्णा बडगुजर, सुनीता पाटील यांनी शासनासह न्यायव्यवस्थेचे आभार मानले आहेत.

## आदिशक्ती एकवीरामातेला चुनरी अर्पण करत घातले साकडे
## अल्पा अग्रवाल यांच्या नेतृत्वामध्ये श्री खंडेराव मंदिरापासून रॅली



धुळे – धुळे जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्यावर ओढवलेले दुष्काळाचे संकट दूर व्हावे, जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाला दिलासा देत सुख-समृद्धी लाभावी, संपूर्ण राज्यात भरपूर पर्जन्यवृष्टी व्हावी यासाठी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज सकाळी खान्देश कुलस्वामिनी आदिशक्ती श्री एकवीरामातेला तब्बल ४०१ फुटांची चुनरी अर्पण करत साकडे घालण्यात आले. यासाठी भारतीय जनता पक्षाच्या बेटी बचाव बेटी पढाव अभियानाच्या प्रदेश प्रभारी अल्पा अनुप अग्रवाल यांच्या नेतृत्वात आग्रा रोडवरील श्री खंडेराव महाराज मंदिरापासून श्री एकवीरामाता मंदिरापर्यंत चुनरी रॅली काढण्यात आली. रॅलीत भाजप महिला आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

धुळे जिल्ह्यासह राज्यात यंदा पावसाअभावी दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. राज्यातील दुष्काळी संकटाचे निवारण व्हावे, या परिस्थितीतून सावरत शेतकऱ्यांना सुख-समृद्धी लाभावी, संपूर्ण राज्यात भरपूर पाऊस होऊन रानशिवार हिरवळीने खुलून जावे यासाठी भारतीय जनता पक्षाचे बेटी बचाव-बेटी पढाव अभियान तसेच भारतीय जनता पक्षाच्या महिला आघाडीतर्फे अल्पा अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी यांच्यासह महिला आघाडी पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात आज सकाळी साडेआठला येथील आग्रा रोडवरील श्री खंडेराव महाराज मंदिरापासून चुनरी पदयात्रेला प्रारंभ झाला.

या पदयात्रेत अल्पा अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, महापालिकेच्या स्थायी सभापती लताबाई पोतदार, महिला व बालकल्याण सभापती उज्वला ठाकरे, भाजप महिला आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस जयश्री अहिरराव, महिला महानगर जिल्हाध्यक्षा सुवर्णा पाटील, बेटी बचाव बेटी पढावच्या धुळे जिल्हा संयोजिका कुंतल अग्रवाल, नगरसेविका कल्याणी अंपळकर, कल्पना महाले, प्रतिभा चौधरी, डॉ. निशा महाजन, प्रभावती शिंदे, योगिता कुटे, वंदना भामरे, वैभवी दुसाने, उज्वला भोसले, संध्या कदम, रूपाली पाटील, शीतल वाघ, पुष्पा पवार, मोहिनी धात्रक, मोहिनी गौड, शीतल बोरसे, सोनल नांद्रे, सोनल बैरागी, काजल नेमाने, मंजुषा नेमाने, पूर्वा अग्रवाल, नीलू अहिरे, सरला अहिरे, पायल अग्रवाल, श्रेया अग्रवाल, खुशी गुप्ता, सारिका अग्रवाल, नीतू अग्रवाल, अमोल अग्रवाल, प्रथमेश गांधी, नगरसेवक नागसेन बोरसे, कमलेश देवरे, पवन मराठे यांच्यासह भाजपच्या महिला पदाधिकारी व विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. चुनरी पदयात्रेत शहरातील महाराणा प्रताप विद्यालय, परिवर्तन हायस्कूल, अभिजित ठाकरे विद्यालय, एसएनडीटी महिला महाविद्यालय, कमलाबाई अजमेरा विद्यालयातील विद्यार्थिनींसह डॉ. के. डी अरगडे, मनोहर चौधरी, स्मिता अजमेरा यांच्यासह शिक्षक, शिक्षिका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. श्री खंडेराव मंदिरापासून वाद्यांच्या गजरात सर्व महिला पदाधिकारी व विद्यार्थिनींनी ४०१ फुटांची चुनरी हाती घेत आणि कुलस्वामिनी एकवीरामातेचा जयजयकार करत पदयात्रेला प्रारंभ केला. यावेळी विद्यार्थिनींनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या बचतपर संदेशांचे फलक हाती धरले होते. शिवाय महिला पदाधिकारी चौकाचौकांत गरबाच्या फेर धरत वाटचाल करत होत्या.



# रुग्णाच्या खिशात पैसे नसले, तरी त्याच्या जगण्याची आशा कमी होऊ देऊ नका! डॉक्टरांच्या हातात केवळ उपचार नसतात, तर एखाद्या कुटुंबाचे संपूर्ण जग सामावलेले असते!

## वैद्यकीय विद्यार्थ्यांशी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचा हृदयस्पर्शी संवाद





धुळे (जिमाका) – एखादा गरीब शेतकरी आजारी पडतो, तेव्हा त्याच्यापुढे केवळ आजाराचे संकट नसते. उपचारासाठी पैसे कुठून आणायचे, घर कसे चालवायचे आणि आपल्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबाचे पुढे काय होणार, अशा अनेक चिंता त्याच्या मनात असतात. अशा वेळी डॉक्टरांनी दिलेला आधार, आपुलकीचे दोन शब्द आणि योग्य उपचार त्या रुग्णासाठी जगण्याची नवी आशा ठरू शकतात. म्हणूनच डॉक्टर होताना केवळ पदवी, पैसा आणि प्रतिष्ठेचा विचार करू नका. उपचारासाठी आलेल्या प्रत्येक रुग्णामध्ये एक माणूस पाहा. श्रीमंताला पंचतारांकित रुग्णालयात जसे उपचार मिळतात, तसेच उपचार एखाद्या गरीब रुग्णालाही मिळाले पाहिजेत. कारण प्रत्येकाचा जीव तितकाच मोलाचा असतो, असा संवेदनशील संदेश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी भावी डॉक्टरांना दिला.

धुळे येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाला भेट देऊन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी वैद्यकीय आणि परिचर्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडचणी जाणून घेतल्या. त्यांच्या भविष्यातील स्वप्नांविषयी चर्चा केली. डॉक्टर झाल्यानंतर समाजाप्रती असलेली जबाबदारी, ग्रामीण भागातील आरोग्यसेवेची गरज, तरुणांचे बदलते जीवन आणि पुढील शिक्षणासाठी आवश्यक संधी अशा अनेक विषयांना स्पर्श केला. त्यांच्या संवादातून वैद्यकीय शिक्षणाबरोबरच माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित झाले.

डॉक्टर होण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक वर्षे कठोर परिश्रम करावे लागतात. त्यांच्या शिक्षणासाठी आई–वडीलही मोठी स्वप्ने पाहतात, अनेकदा स्वतःच्या गरजा बाजूला ठेवतात. या मेहनतीतून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग केवळ स्वतःच्या प्रगतीपुरता मर्यादित न राहता गरजू माणसाच्या आयुष्यात बदल घडविण्यासाठी झाला पाहिजे, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी व्यक्त केली.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांसाठी आजारपण म्हणजे आर्थिक संकट असते. मोठ्या शहरात जाऊन उपचार घेणे प्रत्येकाला शक्य होत नाही. अशा परिस्थितीत चांगले डॉक्टर खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. डॉक्टर झाल्यानंतर गावात, तालुक्याच्या ठिकाणी आणि आरोग्यसुविधांची गरज असलेल्या भागात काम करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी ठेवावी. रुग्ण गरीब असो किंवा श्रीमंत, त्याला मिळणाऱ्या उपचारांमध्ये भेदभाव होता कामा नये. रुग्णाच्या चेहऱ्यावरचे दुःख समजून घेणारा आणि त्याला विश्वास देणारा डॉक्टर समाजाला हवा आहे, असे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सांगितले.

आजच्या तरुण पिढीसमोर संधी भरपूर आहेत. मात्र, त्याचबरोबर मोबाईल, समाजमाध्यमे आणि व्यसनांचे आकर्षणही वाढत आहे. यूट्यूब, व्हॉट्सप, इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर नकळत तासन्तास निघून जातात. आयुष्यातील हा मौल्यवान वेळ पुन्हा मिळत नाही. त्यामुळे वेळेचा उपयोग स्वतःला घडविण्यासाठी आणि इतरांच्या आयुष्यात काहीतरी चांगले घडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले. मोबाईलच्या पडद्यापुरते आयुष्य मर्यादित न ठेवता पुस्तकांशी मैत्री करा, खेळाच्या मैदानावर जा, आपल्या आवडी जोपासा आणि समाजासाठी वेळ द्या. आपल्याला घडविण्यासाठी अनेकांनी कष्ट घेतले आहेत. त्या कष्टांची जाणीव ठेवून आयुष्यात यशस्वी झाल्यानंतर समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करा, असा संदेशही त्यांनी दिला. स्वतःच्या वैयक्तिक आणि प्रशासकीय जीवनातील अनुभव सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना मेहनत, शिस्त आणि जबाबदारीचे महत्त्व समजावून सांगितले.

एखाद्या छोट्याशा गावातील मुलाला पांढरा कोट घालून डॉक्टर व्हायचे असते. मात्र, त्या स्वप्नापर्यंत पोहोचण्याचा मार्ग त्याला माहीत नसतो. वैद्यकीय शिक्षणासाठी कोणती परीक्षा द्यावी लागते, अभ्यास कसा करायचा, तयारी कुठून सुरू करायची, याची माहिती नसल्यामुळे अनेक मुलांना योग्य दिशा मिळत नाही. अशा मुलांपर्यंत वैद्यकीय शिक्षणाचे मार्गदर्शन पोहोचले पाहिजे, अशी भूमिका जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी मांडली. यासाठी श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील इंटर्न डॉक्टरांनी शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधावा. मुला–मुलींना त्यांच्या आरोग्याविषयी आवश्यक माहिती द्यावी. त्याचबरोबर डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना छएएढ परीक्षा, अभ्यासाचे नियोजन आणि वैद्यकीय शिक्षणाच्या संधी याबाबत मार्गदर्शन करावे, असे त्यांनी सांगितले. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा थोडासा वेळ शालेय मुलांसाठी दिला, तर एखाद्या ग्रामीण विद्यार्थ्याला आयुष्याची दिशा मिळू शकते. आज वैद्यकीय शिक्षण घेणारा विद्यार्थी उद्या एखाद्या गरीब कुटुंबातील मुलासाठी प्रेरणा ठरू शकतो. अशा उपक्रमातून शिक्षणाबरोबरच समाजसेवेची भावनाही अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. किशोरवयात मुलींच्या शरीरात अनेक बदल होतात. काही प्रश्न मनात असतात, पण ते कोणाला विचारावेत, याबाबत संकोच वाटतो. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील मुलींना योग्य व शास्त्रीय माहिती मिळणे आवश्यक आहे. त्यांना आपल्या आरोग्याविषयी मोकळेपणाने बोलता यावे, गैरसमज दूर व्हावेत आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने जिल्ह्यातील १३ ते १६ वर्षे वयोगटातील विद्यार्थिनींसाठी विशेष आरोग्य मार्गदर्शन उपक्रम राबविण्याचा मानस जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी व्यक्त केला.

पुढील १० दिवसांत जिल्ह्यातील शाळांमध्ये 'प्रजनन आरोग्य आणि योग' या विषयांवर तज्ज्ञांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याचे नियोजन आहे. मुलींना किशोरवयातील शारीरिक बदल, आरोग्याची काळजी आणि योगाचे महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगण्यात येणार आहे. मुलींना त्यांच्या आरोग्याविषयी योग्य माहिती मिळावी आणि त्या निरोगी व आत्मविश्वासाने पुढे जाव्यात, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. यासाठी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, शिक्षणाधिकारी आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन चर्चा केली आहे. या उपक्रमात इंटर्न डॉक्टर, पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा सहभाग घेण्यात येणार आहे.

डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी केवळ विद्यार्थ्यालाच नव्हे, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबालाही मोठी मेहनत घ्यावी लागते. वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी काही विद्यार्थ्यांना खासगी प्रशिक्षण आणि ऑनलाइन पवर वर्षाला २ लाख, ३ लाख, तर काही ठिकाणी ५ लाख रुपयांपर्यंत खर्च करावा लागतो. सर्वसामान्य कुटुंबातील आई–वडिलांसाठी हा खर्च मोठा आर्थिक भार ठरतो. विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी पालकांना एवढा मोठा खर्च करावा लागू नये, यासाठी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी मोफत शैक्षणिक प विकसित करण्याची संकल्पना मांडली आहे. गुणवत्तापूर्ण तयारीची संधी केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांपुरती मर्यादित राहू नये, तर सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ मिळावा, हा त्यामागील विचार आहे. या प्रस्तावित पचा उपयोग श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह जिल्ह्यातील इतर वैद्यकीय, परिचर्या आणि आयुर्वेदिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना व्हावा, असा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या गरजा जाणून घेण्यासाठी गुगल फॉर्म उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यामध्ये आवश्यक माहिती भरून तातडीने सादर करण्यास सांगण्यात आले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी विद्यार्थ्यांशी कोणताही औपचारिकपणा न ठेवता संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या, त्यांच्या भविष्यातील ध्येयांवर चर्चा केली आणि स्वतःच्या आयुष्यातील अनुभवही सांगितले. त्यांच्या या संवादातून विद्यार्थ्यांना करिअरच्या संधींबरोबरच समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळाली. डॉक्टरांच्या गळ्यातील स्टेथोस्कोप केवळ रुग्णाच्या हृदयाचे ठोके ऐकण्यासाठी नसतो, तर त्या ठोक्यांमागील वेदना, आशा आणि जगण्याची धडपड समजून घेण्याची संवेदनशीलताही त्यांच्यात असली पाहिजे. वैद्यकीय ज्ञानाला माणुसकीची जोड मिळाली, तर डॉक्टर केवळ आजारावर उपचार करणारे राहत नाहीत, तर संकटात सापडलेल्या कुटुंबाचा आधार बनतात. हाच भावनिक आणि सामाजिक संदेश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या या संवादातून भावी डॉक्टरांपर्यंत पोहोचला. या संवाद कार्यक्रमाला श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अजित पाठक, डॉ. अरुण मोरे, 'सेवांकुर' संस्थेचे प्रतिनिधी, महाविद्यालयातील प्राध्यापक, इंटर्न डॉक्टर, पदवी व पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच परिचर्या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

# ओबीसी महामंडळाची एकरकमी परतफेड योजना; कर्जमुक्त होण्याची संधी; पात्र कर्जदारांनी सवलतीचा लाभ घेऊन थकीत कर्जाचा निपटारा करावा-जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे

धुळे (जिमाका) – व्यवसाय उभा करण्यासाठी घेतलेले कर्ज आर्थिक अडचणींमुळे वेळेवर फेडता आले नाही आणि त्यावर व्याजाचा बोजा वाढत गेला, अशा कर्जदारांसाठी दिलासादायक संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने थकीत कर्जदारांसाठी एकरकमी परतफेड (ज्ह्ढ) योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेंतर्गत संपूर्ण थकीत मुद्दल व सवलतीनंतरचे व्याज एकरकमी भरणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना थकीत व्याजाच्या रकमेत ५० टक्के सवलत मिळणार आहे. कर्जदारांनी या संधीचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन महामंडळाचे धुळे जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे.

महामंडळाच्या विविध कर्ज योजनांतर्गत धुळे जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगार आणि व्यवसाय उभारण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. मात्र, काही लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे विहित मुदतीत कर्जाची परतफेड करता आलेली नाही. परिणामी, मुद्दल आणि व्याजाची थकबाकी वाढली आहे. अशा लाभार्थ्यांना थकीत कर्जाच्या ओझ्यातून बाहेर पडण्यासाठी महामंडळाने एकरकमी परतफेडीची संधी उपलब्ध करून दिली असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी दिली आहे. या योजनेनुसार लाभार्थ्याने संपूर्ण थकीत मुद्दल आणि थकीत व्याजातील ५० टक्के सवलत वजा करून उर्वरित व्याजाची रक्कम एकरकमी भरल्यास संबंधित कर्ज खात्याचा निपटारा करता येणार आहे. त्यामुळे व्याजाचा आर्थिक बोजा कमी होऊन कर्जदारांना थकबाकीतून मुक्त होण्याची संधी मिळणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी या सवलतीचा लाभ घेऊन कर्जाची एकरकमी परतफेड करावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे.

थकीत कर्जाची परतफेड न झाल्यास महामंडळामार्फत कर्जवसुलीसाठी वैधानिक प्रयत्न करण्यात येतात. मात्र, एकरकमी परतफेड योजनेचा लाभ घेऊन थकीत मुद्दल व सवलतीनंतरचे व्याज भरल्यास लाभार्थ्यांना कर्ज खात्याचा निपटारा करून भविष्यातील संभाव्य कायदेशीर कार्यवाही टाळता येऊ शकते. त्यामुळे थकबाकीदारांनी या संधीचा लाभ घेऊन कर्जमुक्त होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे.

महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळावा आणि त्यांची कर्ज खाती निकाली निघावीत, हा या योजनेचा उद्देश आहे. पात्र कर्जदारांनी अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब सामाजिक न्याय भवन, ए विंग, तळमजला, सिंचन भवन मार्ग, साक्री रोड, धुळे येथे संपर्क साधावा. अधिकाधिक थकबाकीदारांनी एकरकमी परतफेड योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे.

# विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या वेळापत्रकात बदल; अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार-जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे आवाहन

धुळे (जिमाका) – लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा असून, त्यासाठी मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (ज्ञ्छ्ठ) कार्यक्रमाच्या वेळापत्रकात बदल करून दावे व हरकती दाखल करण्याची मुदत २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविली आहे. धुळे जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन मतदार यादीतील आपली नोंद तपासावी. आवश्यक असल्यास नाव नोंदणी, दुरुस्ती तसेच दावे व हरकती विहित मुदतीत दाखल कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या १२ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या निर्देशानुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यापूर्वी दावे व हरकती दाखल करण्यासाठी ९ ऑक्टोबरपर्यंत मुदत होती. आता ही मुदत वाढवून २६ ऑक्टोबर करण्यात आली आहे. त्यामुळे पात्र नागरिकांना मतदार यादीतील नोंदी तपासून आवश्यक कार्यवाही करण्यासाठी अतिरिक्त कालावधी उपलब्ध झाला आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी ३१ ऑगस्ट ते २६ ऑक्टोबर २०२६ असा राहील. प्राप्त दावे व हरकतींची नोटीस प्रक्रिया, सुनावणी व निकाली काढण्याची कार्यवाही १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सांगितले की, मतदार यादी अचूक व अद्ययावत राहण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. पात्र नागरिकांचे नाव यादीत नसल्यास किंवा विद्यमान नोंदीमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्यास विहित प्रक्रियेनुसार अर्ज करावा. तसेच मतदार यादीसंदर्भातील दावे व हरकती निश्चित मुदतीत दाखल कराव्यात. मतदार यादीतील अचूक नोंद ही प्रभावी लोकशाही सहभागाची पहिली पायरी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पात्र नागरिकांनी अंतिम तारखेची वाट न पाहता आपली नोंद तपासून आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी. विशेषतः प्रथमच मतदार म्हणून पात्र ठरणाऱ्या युवक-युवतींनी या प्रक्रियेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.

# सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षांसाठी १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – मैदानावर घाम गाळून यशाची शिखरे गाठणारे खेळाडू, आपल्या मार्गदर्शनातून प्रतिभावंत खेळाडू घडविणारे प्रशिक्षक, साहसी उपक्रमांतून वेगळी ओळख निर्माण करणारे साहसवीर आणि शारीरिक मर्यादांवर मात करत क्रीडाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे दिव्यांग खेळाडू यांच्या कर्तृत्वाला राज्यस्तरावर सन्मान मिळवून देणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत धुळे जिल्ह्यातील अधिकाधिक पात्र खेळाडू व क्रीडा मार्गदर्शकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील यांनी केले आहे.

क्रीडाक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन खेळाडू व क्रीडा मार्गदर्शकांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत दरवर्षी विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यामध्ये जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम) तसेच शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील विविध क्रीडाप्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या पात्र व्यक्तींनी संबंधित पुरस्कारांसाठी अर्ज करावेत, असे श्री. पाटील यांनी स्पष्ट केले.

शासनाच्या २९ डिसेंबर २०२३ व २५ जानेवारी २०२४ रोजीच्या निर्णयांनुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची सुधारित नियमावली, २०२३ लागू करण्यात आली आहे. या नियमावलीनुसार सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या दोन वर्षांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. १२ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्ज स्वीकारले जाणार असून, इच्छुकांनी अंतिम तारखेची वाट न पाहता विहित मुदतीत अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील यांनी केले आहे.

पुरस्कारांसाठी अर्ज करण्याची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. इच्छुक खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, साहसी उपक्रमांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती तसेच दिव्यांग खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या हीींि://ीििी.रहरीरिहीर.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत. अर्जदारांनी संबंधित पुरस्काराची नियमावली, पात्रता व आवश्यक कागदपत्रांची माहिती तपासून आपले अर्ज अचूकपणे भरावेत. १५ नोव्हेंबर २०२६ नंतर अर्ज स्वीकारले जाणार नसल्याने पात्र व्यक्तींनी वेळेत अर्ज सादर करावेत, असे श्री. पाटील यांनी सांगितले.

धुळे जिल्ह्यातील अनेक खेळाडू आणि क्रीडा मार्गदर्शक विविध क्रीडाप्रकारांत मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या बळावर आपली ओळख निर्माण करत आहेत. अशा कर्तृत्ववान व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्काराच्या माध्यमातून आपल्या कामगिरीला सन्मान मिळविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून ही माहिती जिल्ह्यातील प्रत्येक पात्र खेळाडू व क्रीडा मार्गदर्शकापर्यंत पोहोचावी आणि अधिकाधिक पात्र व्यक्तींनी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील यांनी केले आहे.

# दुष्काळाची ओळख पुसून शिंदखेड्याच्या शिवारात समृद्धीची नवी पहाट उगवणार! टप्प्याटप्प्याने सिंचनाचा लाभ देण्याचा प्रयत्न-पालकमंत्री जयकुमार रावल

धुळे (जिमाका) – पिढ्यानपिढ्या दुष्काळाशी संघर्ष करणाऱ्या शिंदखेडा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात आता परिवर्तनाची नवी पहाट उगवणार आहे. वर्षानुवर्षे पावसाच्या भरवशावर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत तापी नदीचे पाणी पोहोचविण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेंतर्गत जामफळ धरणाच्या बंदिस्त नलिका वितरण प्रणालीच्या (पीडीएन) मुख्य पाइपलाइन जोडणी कामाचा आज शुभारंभ करण्यात आला. या योजनेमुळे ५४ गावांच्या शेतीला शाश्वत सिंचनाचा आधार मिळणार आहे. शिंदखेडा तालुक्याच्या माथ्यावर असलेला दुष्काळाचा शिक्का कायमचा पुसून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धी आणण्याचा आपला संकल्प असल्याचे राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. जामफळ धरण येथे पीडीएन योजनेच्या मुख्य पाइपलाइन जोडणी कामाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, खलाण्याचे माजी जि.प. सदस्य पंकज कदम, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता भारत शिंगाडे, कार्यकारी अभियंता संदीप पवार, स्वप्नील गांगुर्डे, विशाल खैरनार, केतन भोसले, अमरदीप पाटील यांच्यासह **(पान ४ वर)**

**हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय - घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे - ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर - भ्रमणध्वनी - ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार - ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)**
**(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)**

# नाशिक येथे भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यकारिणी व पदाधिकारी संवाद मेळावा २०२६ नाशिक येथे उत्साहात संपन्न





नाशिक – भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चाच्या वतीने शुक्रवार , दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ विभागीय कार्यकारिणी व पदाधिकारी संवाद मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्याला प्रदेश प्रभारी मा. मिलिंदजी तुळसकर साहेब व प्रदेशध्यक्ष मा. विजय हरगुडे यांचे मार्गदर्शन लाभले, अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. मेळाव्यातील प्रमुख विषय. कामगारांच्या विविध समस्या व न्याय्य हक्कांचे संरक्षणकेंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ कामगारांपर्यंत पोहोचविणे कामगारांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे मार्ग काढणे संघटनात्मक बळकटीकरण व पदाधिकाऱ्यांमधील समन्वय वाढविणेजिल्ह्यांतील प्रदेश, विभागीय, जिल्हा व मंडळ स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी आपल्या भागातील कामगारांच्या समस्या, संघटनात्मक अडचणी आणि आगामी कार्ययोजनांबाबत आपली मते मांडली. प्रमुख उपस्थिती मा. मिलिंदजी तुळसकर साहेब – प्रदेश प्रभारी मा. विजय हरगुडे साहेब – प्रदेशाध्यक्ष कामगारांचे सक्षमीकरण, हक्कांचे संरक्षण आणि संघटनेचे बळकटीकरण हाच आमचा संकल्प!कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी, शासनाच्या योजनांचा लाभ पात्र कामगारांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चाचे संघटन पश्चिम विदर्भात अधिक मजबूत करण्यासाठी हा संवाद मेळावा निश्चितच प्रेरणादायी ठरला.तसेच आमदार मा.अनुप भैय्या अग्रवाल व जिल्हाध्यक्ष मा. गजेंद्र काका अंपळकर यांच्या आदेशाने नवीन नियुक्ती देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आल्या,

योगेश हिरामण कोठावदे–सरचिटणीस, चंद्रकांत रामदास भामरे – सरचिटणीस, रावसाहेब आनंदराव नांद्रे – उपाध्यक्ष, किसन पुंजू जाधव– उपाध्यक्ष, भरत नथू निकम–उपाध्यक्ष, अशोक भिकाजी जाधव–चिटणीस.

यावेळी उपस्थित पदाधिकारी – भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चा – श्री. विजय भाऊ पवार – प्रदेश उपाध्यक्ष,श्री. किशोरजी जाधव – प्रदेश जिल्हा विधी सल्लागार, सौ नेहा सुरज अहिरराव जिल्हाध्यक्ष भाजपा कामगार मोर्चा,श्री. अंकुश नंदवाळकर – सरचिटणीस,सौ. माधुरी भावसार – सरचिटणीस,श्री. योगेश कोठावदे – सरचिटणीस,श्री. चंद्रकांत भामरे – सरचिटणीस,श्री. देविदास मिस्तरी– वरिष्ठ उपाध्यक्ष,श्री. विजय शिरसाठ – उपाध्यक्ष ,सौ. प्रीती परदेशी – उपाध्यक्ष,श्री. रावसाहेब नांद्रे – उपाध्यक्ष,श्री. किसन जाधव – उपाध्यक्ष,श्री. भरत निकम – उपाध्यक्ष,श्री. राजेंद्र गांगुर्डे – चिटणीस,श्री.अशोकजी जाधव – चिटणीस,श्री. दीपक सोनार –चिटणीस,श्री. मेहमूद अन्सारी.

# राष्ट्रीय आरोग्य निधीसह विविध आरोग्य योजनांत समावेशासाठी हिरे मेडिकल कॉलेजसह जिल्हा रुग्णालयाने त्वरित प्रस्ताव द्यावा–आमदार अनुपभैया अग्रवाल





धुळे–शहरासह जिल्ह्यातील सर्वसामान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच गरजू नागरिकांना राष्ट्रीय आरोग्य निधीसह केंद्र शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांचा लाभ मिळण्यासाठी येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय आणि जिल्हा शासकीय रुग्णालयाने त्वरित शासनाकडे प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी केली आहे.

या संदर्भात आमदार अग्रवाल यांच्यातर्फे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अजित पाठक, शहरातील जिल्हा शासकीय रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे यांना पत्र देण्यात आले. आमदार अग्रवाल यांच्यातर्फे भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष सचिन शेवतकर, रुग्णसेवक अशोक जाधव, चंद्रकांत भामरे, सुनील विसपुते, किसन जाधव, प्रशांत साठमोहन, हेमंत कचवे, रुद्राक्ष उपासनी यांनी हे पत्र दिले. पत्रात म्हटले आहे, धुळे शहरातील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह सर्वोपचार रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालयात फक्त धुळे शहर, जिल्ह्यातीलच नव्हे, तर लगतच्या जळगाव जिल्ह्यातील अमळनेर, चाळीसगाव, पारोळा आणि नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यांतील अनेक रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी येत असतात. यामध्ये सर्वसामान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच गरजू नागरिकांचा समावेश असतो. या रुग्णांना राष्ट्रीय आरोग्य निधीअंतर्गत तसेच केंद्र शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांचा लाभ मिळणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा शासकीय रुग्णालयाचा राष्ट्रीय आरोग्य निधी तसेच केंद्र शासनाच्या इतर संबंधित आरोग्य योजनांमध्ये आवश्यक त्या पद्धतीने समावेश नसल्यामुळे अनेक पात्र व गरजू रुग्णांना या आरोग्यविषयक योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत.

जिल्ह्यातील प्रमुख शासकीय वैद्यकीय संस्था म्हणून भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा शासकीय रुग्णालयाचा संबंधित योजनांमध्ये समावेश झाल्यास धुळे जिल्ह्यासह परिसरातील गरीब व गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळू शकतो. या पार्श्वभूमीवर त्यामुळे हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा शासकीय रुग्णालय प्रशासनाने आपल्या स्तरावरून तातडीने आवश्यक ती कार्यवाही करून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे लवकरात लवकर सादर करावा, अशी सूचना आमदार अग्रवाल यांनी केली आहे.

**(पान ३ वरून)** **पालकमंत्री जयकुमार रावल**

संबंधित अधिकारी, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, शिंदखेडा तालुक्याच्या एका बाजूला बारमाही वाहणारी तापी नदी असतानाही अवघ्या काही किलोमीटर अंतरावरील गावांना वर्षानुवर्षे दुष्काळाचा सामना करावा लागला. पाऊस झाला तर पीक, अन्यथा नुकसान, अशी परिस्थिती बदलण्यासाठी तापी नदीचे पाणी थेट शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला. दुष्काळावर तात्पुरती मदत नव्हे, तर कायमस्वरूपी सिंचन हाच खरा उपाय आहे. शेतकऱ्यांना वर्षभर शेती करता यावी आणि त्यांच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळावे, यासाठी गेली अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. सुलवाडे–जामफळ प्रकल्पाच्या मंजुरीसाठी सन २०१४ नंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पाठपुरावा करण्यात आला. तत्कालीन केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांनी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांचेही सहकार्य लाभले. फेब्रुवारी २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. त्यानंतर प्रकल्पाच्या कामाला गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. जामफळ धरणाच्या बंदिस्त नलिका वितरण प्रणालीसाठी १,०५८ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांचे भूमिपूजन १० सप्टेंबर २०२४ रोजी विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले होते. या प्रणालीद्वारे ५४ गावांमधील २६,९०७ हेक्टर लाभक्षेत्राला पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. एकूण ७६६.१६४ किलोमीटर पाइपलाइनपैकी ५४८.८१ किलोमीटर पाइपचा पुरवठा झाला असून, ३२४.९३ किलोमीटर पाइपलाइन अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यानुसार पाइपलाइन अंथरण्याची प्रगती ४२.४१ टक्के आहे. प्रकल्पातील पाच रेल्वे आणि तीन राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंगपैकी दाबली, मेलाणे व माळीच येथील रेल्वे क्रॉसिंगची कामे पूर्ण झाली असून, होळ येथील काम अंतिम टप्प्यात आहे. सुलवाडे–जामफळ मुख्य प्रकल्पाचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. संपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्याची वाट न पाहता शेतकऱ्यांना लवकर सिंचनाचा लाभ मिळावा, यासाठी मुख्य पाइपलाइन जोडणीचे काम सुरू करण्यात आले आहे. या माध्यमातून सुमारे १ टीएमसी म्हणजेच २८.३२ दशलक्ष घनमीटर पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. जून २०२७ पासून टप्प्याटप्प्याने सिंचनाचा लाभ देण्याचा प्रयत्न राहील. येत्या तीन ते चार महिन्यांत सुमारे ६ हजार हेक्टर क्षेत्रात पाणी वितरणाची व्यवस्था विकसित करण्याचे, तर पुढील टप्प्यात १३ ते १४ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजन असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.